**प्रेस नोट**

दिनांक ०१/०७/२०२१

| | |
|---|---|
| युनिट | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | रामभाऊ गणपतराव गाडेकर, वय ६४ वर्षे, पद– सरपंच ग्रामपंचायत माहुली चोर ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती रा.गजानन टाउनशिप, घर नं.७१६, कठोरा रोड अमरावती. |
| पडताळणी कार्यवाही दरम्यान मागणी केलेली रक्कम | तक्रारदार व त्यांचे तिन सहकारी यांना प्रत्येकी ३०,०००/– रुपये प्रमाणे एकुण १,२०,०००/– व त्यापैकी पहीला हप्ता प्रत्येकी ५,०००/– रुपये प्रमाणे २०,०००/– रुपये, त्यापैकी ५०००/– स्विकारल्याचे मान्य करुन उर्वरित १५,०००/– लाचेची मागणी. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/– रु. |
| घटनास्थळ | तक्रारदार यांचे सहकारी यांचे राहते घरी ग्राम माहुली चोर ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती. |
| घटना ता. व वेळ | दि.०१/०७/२०२१ चे १४:३४ ते १४.३८ वा. दरम्यान |

**थोडक्यात हकीकत :–** यातील तक्रारदार व त्यांचे गावातील सहकारी यांना महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेले सिंचन विहीर चे मस्टर वर सही करून अनुदान मिळवुन देण्यासाठी माहुली चोर गावचे सरपंच रामभाऊ गाडेकर हे त्यांना प्रत्येक लाभार्थी चे एका सिंचन विहीरीचे ३०,०००/–रू यांप्रमाणे एकुण चार लाभार्थीचे १,२०,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असुन त्यापैकी पहील्या मस्टर चे प्रत्येकी ५०००/–रू याप्रमाणे एकुण २०,००० /– त्यांनी तात्काळ देण्यास सांगीतल्याने तक्रारदार यांनी सिंचन विहीरीचे पहील्या मस्टर चे ५०००/– रू त्यांना नाईलाजास्तव दिले असुन उर्वरीत तिन लाभार्थीचे प्रत्येकी ५०००/–रू असे एकुण १५,०००/– रू ची मागणी करीत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो येथे दिली.

तक्रारदारांने दिलेल्या तक्रारीप्रमाणे दि.३०/०६/२०२१ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही मध्ये सरपंच श्री.रामभाऊ गाडेकर यांनी तक्रारदार व त्यांच्या सोबत असलेल्या लाभार्थ्यांना प्रत्येक सिंचन विहीरी च्या मस्टर वर सही करण्यासाठी प्रत्येकी लाभार्थी चे ३०,०००/– रू लागतीलच असे म्हणून तक्रारदार यांचे कडून यापूर्वी ५०००/– रुपये घेतल्याचे मान्य केले व तक्रारदार यांचे सहकारी उर्वरित लाभार्थी यांचेकडून सिंचन विहीरी च्या मस्टर वर सही करण्यासाठी प्रत्येकी ५०००/– रुपये याप्रमाणे १५,०००/– लाचेची मागणी केली.

दिनांक ०१.०७.२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान सरपंच श्री.रामभाऊ गाडेकर यांनी पंचासमक्ष तक्रारदाराकडून १५,०००/–रु. लाच रक्कम स्विकारल्याने सरपंच श्री.गाडेकर यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र अमरावती चे मा.पोलीस अधिक्षक, श्री. विशाल गायकवाड, अपर पोलीस अधिक्षक श्री.अरुण सावंत, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडू, पोलीस नाईक युवराज राठोड, पोलीस शिपाई राजेश कोचे, शैलेश कडू तसेच चालक सपोउपनि.सतिष किटुकले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :– अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती

टोल फ्री क्र. – १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१ – २५५२३५५, २५५३०५५

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

( अमोल कडू )

पोलीस निरीक्षक

अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती.

Scanned with CamScanner